# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २५ /०१/२०१८**

**स. दु ११.३० वा.**

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.१२/०१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. १२/०१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी अंतर्गत नालासोपारा पूर्व येथील वॉर्ड क्र.८० मध्ये आचोळे डोंगरी पडखळपाडा येथे पाईप गटार बांधणे कामी अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या रक्कम रू. ४६,२४,३४६/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. सखाराम महाडीक<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ३. | पाणीपुरवठा विभागासाठी माहितीपट तयार करणे बाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागासाठी बनविण्यांत आलेल्या माहिती पट व्हिडीओच्या कार्योत्तर मंजूरीसाठी देयक रक्कम रू. ५.२५,०००/- (अक्षरी रू. पाच लाख पंचवीस हजार मात्र) अदा करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी अंतर्गत नालासोपारा पूर्व येथील वॉर्ड ८३ मध्ये राज नगर येथे रश्मी रेसीडेन्सी ते भवानी पार्क येथील रस्त्याच्या दुतर्फा पाईप गटार बांधणे व पेव्हर बसविणे कामी अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. चर्चेअंती पेव्हर ब्लॉक ऐवजी चेकर्ड टाईल्स लावणेंत यावेत त्याप्रमाणे येणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| ५. | शासनाच्या प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच फेज-२ प्रकल्पांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना वेतनापोटी सन २०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षांकरीता अनुदान मिळणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- शासनाच्या प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच फेज-२ प्रकल्पांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना वेतनापोटी सन २०१७-१८ करीता वेतनापोटी महानगरपालिकेकडून १००% अनुदान रु, ४१,६२,५७९/- व ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ चे भविष्य निर्वाह निधी रु. १,५२,२९३/- असे एकूण रु. ४३,१४,८७२/- इतके वसई विरार सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशन्स इंटिग्रेटेड हेल्थ फॅमिली वेल्फेअर सासोयटीस अदा करणेंस व सन २०१८-१९ पासूनचे वेतन महानगरपालिकेकडून अदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) येथील मौजे सोपारा येथून भट्टीला तलावालगत पुढे सोपारा - गास अस्तित्वातील रस्त्याला जोडणारा २० मी. डी.पी. रस्ता विकसीत करणे. या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत. | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३१ दि. ०८/०५/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. सुधाकर दातीर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडीक सूचक :- मा.श्री. अजीत नाईक<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ७. | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र.२८ मधील मनवेलपाडा स्मशानभूमी विकसीत करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७३ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. मे. मेहुल अरविंद वर्तक यांचे अंदाजपत्रकीय ३.९९% जादा हे प्राप्त झालेल्या निविदेतील दर महानगरपालिकेस जास्त वाटत असल्याने दर कमी करणेबाबत चर्चा करणेसाठी संबंधित ठेकेदारास दि. ०२/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तद्अनुषंगाने सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असलेबाबत मे. मेहुल अरविंद वर्तक यांनी दि. ०८/११/२०१७ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेनुसार सकारात्मकदृष्ट्या मे मेहूल अरविंद वर्तक यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम दराची असल्याने महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ८. | श्री.रमेश जमनादास प्रजापती, तारतंत्री, प्रभाग समिती-सी वैद्यकिय बिलाची प्रतीपुर्ती करुन मिळणेबाबत | ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. रमेश जमनादास प्रजापती, तारतंत्री हयांनी तातडीच्या प्रसंगी डॉ. वी. टी. शाह, सैफी हॉस्पिटल, मुंबई येथे दिनांक ०६/०७/१५ ते दि.०९/०७/१५ पर्यंत दाखल करुन त्यांचेवर Open Heart Surgery व औषधोपचार करुन घेतलेले आहेत. तरी रमेश जमनादास प्रजापती, तारतंत्री हयांचे झालेल्या वैद्यकीय खर्चापोटी |

| | | |
|---|---|---|
| | | रक्कम रू. ५,४१,९४६/- मधुन वजावट रक्कम रू. ५४,१९५/- वजा जाता रक्कम रू. ४,८७,७५१/- अक्षरी (रू. चार लाख सत्याऐंशी हजार सातशे एकावन्न मात्र ) अदा करणेस आजची ही सभा वित्तीय व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | **वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) जिवदानी पायथा येथील क्रिकेट मैदान (ग्राऊंड) चे वार्षिक ठेका पध्दतीने देखभाल करणेकामी होणाऱ्या खर्चास कामी प्रशासकिय मान्यता देणेबाबत.** | ठराव :- प्रस्तावित केल्यानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) जिवदानी पायथा येथील क्रिकेट मैदान (ग्राऊंड) वार्षिक स्वरुपात ठेका पध्दतीने प्रतीवर्षी देखभाल रक्कम रू. २३,७३,१०३/- (अक्षरी रू. तेवीस लक्ष त्र्याहत्तर हजार एकशे तीन रू. मात्र) च्या रक्कमेच्या अनुषंगाने सन २०१७ ते २०२० च्या तीन वित्तीय वर्षासाठी होणाऱ्या रक्कम रू. ७१,१९, ३०९/- (अक्षरी रू. एक्काहत्तर लक्ष एकोणीस हजार तीनशे नऊ रू.मात्र) रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत असून, याकामी निविदा प्रक्रिया करणेंस व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मे. रेन्बो कन्स्ट्रक्शन<br>यांना आजची स्थायी समिती मुदतवाढ मंजूर करीत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **वसई विरार शहर महानगरपालिकेने रुग्णालय येथे रुग्णांकडून घ्यावयाच्या निश्चित केलेल्या दरांमधून एच आय व्ही बाधीत क्षयरोग रुग्णांना सवलतीच्या दराने सेवा देणेकामी मान्यता देणेबाबत. (मा.वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि. ११/०१/२०१८ ची शिफारस)** | ठराव :- मा.वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समितीने प्रस्तावित दरानुसार घेण्यांस स्थायी समितीस शिफारस केलेली आहे. तथापि आजची सभा मा.स्थायी समिती सभा असा निर्णय घेत आहे की, महानगरपालिकेच्या रूग्णालयात उपचारासाठी दाखल होणाऱ्या एच.आय.व्ही. बाधीत क्षयरोग रूग्णांच्या (Sputum for AFB, CBC, ESR, Random Blood Sugar, Liver Profile, Renal, X-Ray Chest-PA View, Ultra Sound Graphy) विविध प्रकारच्या चाचण्या विनामोबदला (मोफत) करण्यात याव्यात. तसेच याकामी येणाऱ्या वार्षिक रक्कम रू. ७०,०००/- इतका खर्च महानगरपालिकेस येणार असून त्याकामी ही सभा मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | **सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील तरतुदींचे पुर्नविनियोजन करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | ठराव :- सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात व उल्लेखित लेखा शिर्षावर तरतुद कमी पडत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचित ड प्रकरण-७ नियम २ नुसार सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील (भाग-२ भांडवली खर्च) विकास निधी अंतर्गत सुसरी, राजीवली सातीवली, कामण बंधारे बांधणे पाणीपुरवठा योजना राबविणे देहरजी एन.पी.व्ही. भरणा व इतर नविन उद्भव तयार करणे, तसेच कवडसा बंधाऱ्याची उंची वाढविणे तसेच सुर्या नदी पात्रात ५ बंधारे बांधणे या लेखाशिर्षावरील रू. ३० कोटीमधून उपरोक्त नमूद केलेल्या विविध लेखाशिर्षावर कमी पडत असलेली रू. ५,५९,५९,४६५/- तरतूद पुर्न:विनियोजन करण्यांस ही सभा मान्याता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १२. | लेखा विभागाकडे सन २०१६-१७ मधील प्राप्त झालेली मंजुर देयके सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून अदा करण्याबाबत. | ठराव :- उपरोक्त सादर केलेला प्रस्ताव आजची स्थायी समिती मान्य करीत असून लेखा विभागाकडे सन २०१६-१७ मधील प्राप्त झालेली मंजूर देयके सन देयके सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून अदा करणेकामी येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १३. | डांस नियंत्रणात्मक व जंतूकिटकनाशके खरेदीकामी प्राप्त निविदाधारकांसोबत संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त नमूद प्रस्तावाचे अवलोकन करणेंत आले. प्रस्तावातील मजकूरामध्ये नमूद अभिकर्त्यासोबत संविदा करणेकामी व पुढील कार्यवाही करणेकामी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे, विषय मंजूर.<br>अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. सखाराम महाडीक<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. २५/१२/२०१७ ते दि. ३१/१२/२०१७ दिनांक ०१/०१/२०१८ ते दि. ०७/०१/२०१८ तसेच दिनांक ०८/०१/२०१८ ते १४/०१/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घनांचे प्रतिवृत्त माहितीसाठी स्थायी समिती सादर. | ठराव :- सदर बाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली. त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेंस सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १५. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड नं.१०४ मधील हनुमान नगर येथील रस्ता डांबरीकरण करणेकामी मंजूर निविदाधारका बरोबर संविदा करण्यास मंजूरी देणे. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे.आर. व्हि.धोत्रे कन्स्ट्रक्शन यांची निविदा ५.१०% कमी दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका